पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१७/१२/२०२३
## दि.१६/१२/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे २५४/२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३० वर्षे,रा.सदानंदनगर,मंगळवार पेठ,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/१२/२०२३ रोजी २२/०५ ते २२/१० वा.चे दरम्यान ज्ञानेश्वर पादुका चौक,शिवाजीगनर पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया पायी जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन, फिर्यादी यांचे हातातील काळया रंगाची पर्स हिसकावून,त्यामधील ५००/- रूपये रोख रक्कम, सोन्याचे पाच मणी व सोन्याचे मंगळसुत्र २०,०००/- रू किमतीचे जबरी चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. सचिन तरडे ९५०३५६७३२२ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे ४२९/२०२३,भादविक ३२४,३२३,५०४,५०६,४२७,३४,महा.पो.का.क.३७(१)१३५ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-२५ वर्षे,रा.काशेवाडी,भवानी पेठ,पुणे |
| **आरोपीत** | १.एक इसम व त्याचे इतर दोन साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/१२/२०२३ रोजी १६/३० वा.४१३,लक्ष्मी कुंज बिल्डींग,हरकानगर,काशेवाडी, भवानी पेठ, पुणे येथे राहते घरासमोर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी आ.क्र.०१ याचेविरुध्द तक्रार दिली होती. सदरची तक्रार फिर्यादी यांनी मागे घेतली नसल्याचे कारणावरून,त्याचा राग मनात धरुन,सदर ठिकाणी फिर्यादी यांना हाताने,लाकडी दांडके त्यांचे आईला शिवीगाळ व हाताने मारहाण करुन जखमी केले. तसेच फिर्यादी यांचे आईचा मोबाईल फोडुन,तु अगर तक्रार वापस नही लिया,तो कल तुझे जान से मार दुंगा अशी धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.फौज. शेख ७३५०७४२७४२ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे ५७९/२०२३,भादविक ३९५,३९७,४२७,आर्म ॲक्ट कलम ४(२५),महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३),क्रिमीनल लॉ ॲमिटमेंट कलम ०३ व ०७ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-३६,रा.मारुतीनगर,वडगांव-शेरी,पुणे |
| **आरोपीत** | तीन इसम व त्याचे इतर ०४ ते ०५ साथीदार (अटक नाही) (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १५/१२/२०२३ रोजी २१/१० वा.बालाजी पान शॉप,मारुतीनगर,वडगांव-शेरी,पुणे या ठिकाणी |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे मारुतीनगर याठिकाणी बालाजी पान शॉपवर काम करतात. फिर्यादी हे पान-टपरीवर हजर असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे हातामध्ये धारदार हत्यारे घेवुन येवुन आरडा-ओरडा करून,सदर परिसरात दहशत निर्माण करीत पान-टपरीवर येवुन, फिर्यादी यांनी त्यांना यापुर्वी घेतलेल्या सिगारेटचे पैसे मागितल्याचा राग मनात धरुन,धारदार हत्याराने व तेथे पडलेल्या दगडांनी फिर्यादी यांचे दुकानाची व दुकानातील सामानाची तोडफोड करुन,त्यांचे दुकानातील गल्ल्यातील अंदाजे १३,५००/- रुपये जबरी चोरी करून नेले आहे. तसेच फिर्यादी यांनी त्यांना विरोध केला असता,त्यांचेकडील हत्याराने फिर्यादीचे डावे दंडावर वार करुन जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अरविंद कुमरे ९५५२५३८३७१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**